जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.९८१९२०८२७९

प्रेसनोट दिनांक १८.११.२०२४

## ''दोन देशी बनावटीचे पिस्टल व ०४ जिवंत काडतुस विनापरवाना बेकायदेशिररित्या कब्जात बाळगणाऱ्या गुन्हेगाराच्या मुसक्या आवळण्यात कल्याण गुन्हे शाखेस यश''

आज दिनांक. १८/११/२०२३ रोजी गुन्हे शाखा, घटक ३, कल्याणचे पोलीसांना मिळालेल्या माहिती वरून, विष्णुनगर पोलीस ठाणे हद्दीत बावन चाळ, रेल्वे मैदान डोंबिवली पश्चिम येथे एक इसम देशी बनावटीचे पिस्टल विक्री करण्याकरीता येणार असल्याची खात्रीशिर बातमी मिळाली होती. सदर मिळालेल्या माहितीप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अजित शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने बावनचाळ, गणेश मंदिर जवळ जावून सापळा लावून इसम सुधीर रामनिवास ठाकुर वय २२ वर्षे रा. नगला जगमोहन गाव, तहसिल–फतेहाबाद जिल्हा आग्रा राज्य– उत्तरप्रदेश यास ताब्यात घेवुन त्याचे कब्जातुन ९०,०००/– रूपये किंमतीचे दोन देशी बनावटीचे पिस्टल व ४०००/– रूपये किंमतीचे ०४ जिवंत काडतुस असा एकुण ९४,०००/– रूपये किंमतीचे ०२ देशी बनावटीचे पिस्टल व ०४ जिंवत काडतुसे विनापरवाना बेकायदेशिररित्या स्वत:च्या कब्जात बाळगलेला असताना मिळून आल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले होते.

त्यानंतर इसम नामे सुधीर रामनिवास ठाकुर वय २२ वर्षे रा. नगला जगमोहन गाव, तहसिल–फतेहाबाद जिल्हा आग्रा राज्य– उत्तरप्रदेशयाचे कब्जात विनापरवाना बेकायदेशिर रित्या ०२ देशी बनावटीचे पिस्टल व ०४ जिंवत काडतुसे मिळून आल्याने त्याने पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर यांचेकडील मनाई आदेशाचा भंग केल्याने त्याचे विरूध्द विष्णुनगर पोलीस ठाणे, डोंबिवली पश्चिम येथे भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ व मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१) १३५ प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील अधिक तपास गुन्हे शाखा, घटक ३, कल्याण कडून करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी श्री.शिवराज पाटील, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, व श्री.शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (शोध १) गुन्हे शाखा, ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अजित शिंदे, सपोनि/संतोष उगलमुगले, पोउपनि/विनोद पाटील, पोलीस अंमलदार अनुप कामत, किशोर पाटील, गुरूनाथ जरग, मिथुन राठोड, विलास कडु सर्व नेम. गुन्हे शाखा, घटक–३, कल्याण यांनी केलेली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर